# मेट्रो रेल स्थानकाजवळ हिरवळ

## २६०० झाडांचे वृक्षारोपण करणार ; पर्यावरणदिनी मेट्रो रेलचा पर्यावरणपूरक उपक्रम



**मुंबई** : पर्यावरणाच्या संवर्धनासाठी अधिकाधिक झाडांची लागवड काळाची गरज आहे. बुधवारी जागतिक पर्यावरण दिनी १३ मेट्रो रेल स्थानकाजवळ ५०० हून अधिक झाडांची लागवड केली असून, आणखी २,६०० झाडांची लागवड करण्यात येणार आहे. दरम्यान, सीप्झ, एम.आई.डी.सी, शितलादेवी, दादर, सिद्धिविनायक, सायन्स म्युझियम, महालक्ष्मी, मुंबई सेंट्रल, सी.एस.एम.टी, चर्चगेट, विधान भवन आणि कफ परेड या १३ मेट्रो स्थानकांजवळ ५०० हून अधिक झाडे लावली आहेत.

उच्च न्यायालय, मुंबईला सादर केलेल्या हमी पत्रानुसार, मुं.मे.रे.कॉ. मार्ग -३ च्या मेट्रो स्थानकांवर व शेजारच्या भागात सुमारे २६०० झाडे लावणार आहेत. त्यानुसार मुं.मे.रे.कॉ.ने मुळ जागी वृक्षारोपण करण्यासाठी तीन कंत्राट दिले आहेत. निवडलेले कंत्राटदार रोपवाटीकेत रुजलेल्या झाडांचा पुरवठा, लागवड आणि देखभाल करतील. स्थानकांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर या झाडांची मुळ जागी लागवड नुकतीच सुरू झाली आहे.

"मुं.मे.रे.कॉ. वृक्षारोपण पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे. विविध स्थानकांवर बांधकाम उपक्रम पूर्ण झाल्यावर आणि अधिक जागा उपलब्ध झाल्यावर वृक्षारोपण केले जाईल. आम्ही विविध घटकांना आमंत्रित करणारे सार्वजनिक आवाहन देखील जारी करणार आहोत; सरकारी/खासगी आस्थापना, परिसर मालक, सहकारी गृहनिर्माण संस्था इ. त्यांच्या जागेत वृक्षारोपण स्वीकारण्यासाठी (किमान १० झाडे). मुं.मे.रे.कॉ. द्वारे नियुक्त केलेले कंत्राटदार वाढ झालेली झाडे लावनू त्यांची तीन वर्ष देखरेख करतील. असे मुं.मे.रे.कॉ. चे संचालक (नियोजन आणि रिअल-इस्टेट डेव्हलपमेंट/एन.एफ.बी.आर) आर. रमणा यांनी सांगितले.

### 'या' झाडांचा समावेश

निवडलेल्या झाडांमध्ये फुलांची झाडे, शोभेची झाडे, सदैव हिरवीगार झाडे इत्यादी ७ वर्ष वयाची आणि सर्वसाधारण उंची १५ फूट आहे . मळू जागी वृक्षारोपण मोहिमेसाठी निवडलेल्या वृक्षांच्या प्रजातींमध्ये _महोगणी, बकुळ, पिंपळ, सोनचाफा, निलमोहोर, तामण, कदंब, देशी-बदाम, आकाश-नीम, स्पाथोडिया, ताबेबुया, अम्ब्रेला-वृक्ष, सप्तपर्णी, पिंपळ, पांगारा, जंगली बदाम, चाफा, इ . यांचा समावेश आहे . आतापर्यंत ५०० होऊन अधिक झाडे लावली आहेत, तयांची तीन वर्ष देखरेख, नियमित सिंचन आणि बागायती पद्धतींसह त्याच कंत्राटदारांकडे असेल . लागवड केलेल्या झाडांमुळे परिसरातील सामान्य पर्यावरणाला फायदा होईल आणि पर्यावरणीय फायद्यांव्यतिरिक्त जैवविविधतेला मदत होईल .